नांदेड येथील उर्दू घराच्या व्यवस्थापन व बाह्ययंत्रणेद्वारे कर्मचारीवृंद नियुक्त करण्यासाठी वर्ष २०१७-१८ साठी निधी वितरित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः नाउघ २०१७/प्र.क्र.२३३/कार्या-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ३१.०३.२०१८

वाचा -

१) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक: उघव्य २०१६/प्र.क्र.१९/कार्या-४, दि.२१ जुलै, २०१७
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं- २०१७/प्रक्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७
३) शासन पूरकपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक: अविवि- २०१७/ प्रक्र.३१/ का.७, दि.१८ ऑगस्ट, २०१७
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं- २०१७/ प्रक्र.७५/अर्थ-३, दि.६ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना :

नांदेड येथील उर्दू घराच्या व्यवस्थापन व बाह्ययंत्रणेद्वारे कर्मचारीवृंद नियुक्त करण्यासाठी वर्ष २०१७-१८ मध्ये अनुदान वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील उर्दू घरांचा वापर, देखभाल व दुरुस्ती तसेच उर्दू घरे सुस्थितीत ठेवण्यासंदर्भात नियामावली विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार उर्दू घरांचे नियंत्रण व व्यवस्थापन संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले, उप-जिल्हाधिकारी पेक्षा कमी नाही अशा दर्जाचे अधिकारी यांचे मार्फत करण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, नांदेड यांना सदर उर्दू घराचा ताबा देण्यात आला असून त्यांनी नांदेड उर्दू घराच्या व्यवस्थापन व बाह्ययंत्रणेद्वारे कर्मचारीवृंद नियुक्त करण्यासाठी अनुदान वितरित करण्याची मागणी केली आहे. उर्दू घरासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.८,००,००,०००/- (रुपये आठ कोटी मात्र) इतक्या योजनांत्तर्गत निधीची तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे. वित्त विभागाने संदर्भ क्र.४ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन उपलब्ध असलेल्या निधीतून, नांदेड उर्दू घराच्या व्यवस्थापन व बाह्ययंत्रणेद्वारे कर्मचारीवृंद नियुक्त करण्यासाठी माहे जानेवारी, २०१८ ते मार्च, २०१८ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी रु.६,९४,७९१/- (रुपये सहा लाख चौऱ्याणव हजार सातशे एक्याण्णव फक्त) इतके अनुदान जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी खर्च विहित मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी.

जिल्हाधिकारी, नांदेड यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या रु.६,९४,७९१/- (रुपये सहा लाख चौऱ्याणव हजार सातशे एक्याण्णव फक्त) इतकी रक्कम अर्थसंकल्पीय प्रणालीतून

आहरण व संवितरण करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. त्यांनी सदर निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडई-१ २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण -२००- इतर कार्यक्रम-राज्य योजनांतर्गत योजना- (००)-(००)(१८) - उर्दू घरासाठी सहाय्यक अनुदाने (२२३५ ए ५५२) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा

हा शासन निर्णय, नियोजन विभाग अनौ.संदर्भ क्र.२३/१४७१, दि.३१.३.२०१८ आणि वित्त विभाग, अनौ. सं.क्र. १००/२०१८/व्यय-१, दि.३१.३.२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११८१६०९७०१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=39e858554371a26f6672b036224cff0a48a63a836a4067a8da9a8cca6d83429e, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2018.03.31 19:57:06 +05'30'

(सं.छ. तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर,
२. आयुक्त, औरंगाबाद महसूल विभाग, औरंगाबाद,
३. जिल्हाधिकारी, नांदेड,
४. अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड
५. आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड,
६. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड,
९. अधीक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई,
१०. खाजगी सचिव, मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (अ.वि.वि.) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
११. स्वीय सहायक, प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. स्वीय सहायक, सह सचिव (अ.वि.वि.),अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. कक्ष अधिकारी (का-७). अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. निवड नस्ती (का-४)/कार्यासन-४, संग्रहार्थ.